।। ॐ ।।

# ‘स्व’-रूपवर्धिनी कार्यवृत्त

ऑगस्ट २०२३

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org

## स्वातंत्र्यदिन चिरायु होवो...

सत्यमेव जयते
आमचे
घोषवाक्य
आहे ।
देवभूमीसम पवित्र
प्राचीन भारत देश
आहे ।।

तपोभूमी ही ऋषिमुनींची नररत्नांची खाण ।
देशासाठी लढले वीर, करी सतीचे वाण ।
भिन्न भाषा-प्रांत-वेष, परी संस्कृती एक हे जाण ।
विविधतेतूनी एकत्वाचा, झरा मनातून वाहे ।।

अमृतवर्षी स्वातंत्र्याच्या मंत्र
नवा जागवू ।
सकलांना सवे घेऊनी
लोकतंत्र अनुसरू ।
स्वर्गाहूनही सुंदर ऐसा
देश महा घडवू ।
मनामनातून
भारतीयांच्या
राष्ट्रप्रेम हे वाहे ।।

## कला गट

आषाढी एकादशीनिमित्त 'समरसतेचे अभंग' हा कार्यक्रम २९ जून रोजी वर्धिनीच्या ओम्कार सभागृहात कला गटाने आयोजित केला. सर्वप्रथम डॉ संजय तांबट सरांनी या कार्यक्रमाचा उद्देश थोडक्यात मांडला. बालशाखेच्या चिमुकल्यांनी वारकऱ्यांच्या वेशात भक्तीभावाने रिंगण सादर केले. त्यानंतर संत ज्ञानेश्वर, संत कबीर, संत मुक्ताबाई, संत जनाबाई अशा अनेक संतांनी समाजात समता, बंधुता, ममता, समरसता रुजवण्यासाठी अभंगांतून केलेल्या प्रार्थनेचे सादरीकरण झाले. विशेष म्हणजे शाखेतील ताई दादांनी हा कार्यक्रम सादर केला. प्रमुख पाहुण्या डॉ. श्यामाताई घोणसे उपस्थित होत्या. मा. श्यामाताईंनी 'भारतीय संत आणि सामाजिक समरसता' या विषयावर सर्वांना मार्गदर्शन केले. त्यांनी गोष्टीतून स्व कर्माचे महत्त्व सांगितले. आषाढी एकादशीनिमित्त सर्वजण अभंगांच्या आणि व्याख्यानाच्या माध्यमातून पांडुरंगाशी एकरूप झाले. कार्यक्रमास वर्धिनीचे कार्यकर्ते, पालक उपस्थित होते. उपस्थित संख्या – १२५

## स्पर्धा परीक्षा केंद्र

◆ **कारगिल विजय दिन व सत्कार समारंभ** – दि. २६ जुलै २०२३ रोजी, कारगिल विजय दिवस आणि २०२०/२१/२२ या वर्षांमध्ये राज्यसेवा तसेच इतर अनेक स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ वर्धिनीच्या ओम्कार सभागृहात आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे श्री. विजय चाफेकर (अतिरिक्त महासंचालक निवृत्त – भारतीय तटरक्षक दल) उपस्थित होते. त्याचबरोबर डॉ. संजय तांबट आणि श्री विश्वास कुलकर्णी सर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कारगिल युद्धामध्ये शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करून करण्यात आली. श्री. चाफेकर सरांनी व्याख्यानातून देशाच्या सीमा संरक्षण करताना तटरक्षक दलाचे महत्त्व, त्यात झालेल्या सुधारणा याची माहिती दिली. पाहुण्यांच्या हस्ते श्री. यमाजी धुमाळ, श्री. अनिकेत कांबळे, PSI रोहित पाटील, PSI वर्षाराणी सुतार, कु. अश्विनी शिर्के यांचा सत्कार झाला.





**स्पर्धा परीक्षा केंद्राचे यशस्वी विद्यार्थी**

**पोलिस उपनिरीक्षक :** १) श्री. मयूर डोंगरे, २) श्री. अक्षय अडवाल, ३) श्री. रोहित पाटील, ४) कु. प्रियंका बैस, ५) कु.अश्विनी शिर्के.

**कर सहायक अधिकारी –** १) श्री. देवा काळे, २) श्री. सचिन पावरा.

**यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन.**



## पाकोळी बालवाडी

बालवाडी सुरू होऊन महिना झाला, मुले शाळेत छान रमली आहेत. सर्व गटात परिपाठ, प्रार्थना, बडबड गीते, अभिनय गीते, गाणी, कृतीयुक्त खेळ व इतर अभ्यास पूर्ण उपक्रमात मुलं उत्साहाने सहभागी होतात.

◆ गुरूपौर्णिमा – दि. ३ जुलैला सर्व गटात गुरूपौर्णिमा शिक्षकांच्या

पूजनाने साजरी झाली. मोठ्या गटात छाया ताईंनी 'गुरुने दिला ज्ञानरूपी वसा...' हे गीत सादर केले. अश्विनी ताईंनी सोनु-मोनूच्या गोष्टीतून गुरूंचे महत्त्व सांगितले.







◆ दीप अमावस्या – दि. १७ जुलैला दिव्यांचे पूजन झाले. वर्गात वेगवेगळ्या प्रकारचे दिवे उत्कृष्ट सजावट करून मांडले होते. या दिवसाची व मांडलेल्या वैशिष्ट्यपूर्ण दिव्यांची माहिती ताईंनी मुलांना सांगितली.

◆ लोकमान्य टिळक जयंती – मोठ्या गटातील वरद घोलप याने टिळकांच्या वेशभूषेतून त्यांची प्रसिद्ध वाक्य सादर केली. पुष्पाताई, मनीषाताई, अश्विनीताई यांनी टिळकांच्या गोष्टी सांगितल्या.







◆ वाढदिवस – दि. २५ जुलैला सर्व गटातील मुलांचे वाढदिवस साजरे झाले. मा. पुष्पाताईंनी, पालकांनी मुलांना औक्षण करून शुभाशीर्वाद व भेटवस्तू दिल्या. शिक्षकांनी संस्कृतमधून मुलांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.



◆ पालक सभा – दि ११ जुलैला या वर्षातील पहिली पालक सभा झाली. १३० पालक उपस्थित होते. मा. पुष्पाताई नडे यांनी वर्धिनीची माहिती व मुख्याध्यापिका सौ. राणीताई काळे यांनी शाळेचे नियम सांगितले व सर्व उपक्रमात सहभागी होण्याची विनंती केली.




◆ कारगिल दिन – दि. २६ जुलै 'कारगिल दिन' मोठ्या गटात साजरा झाला. मुलांनी देशभक्तीपर गाणे सादर केले. मा. पुष्पाताई नडे यांनी कारगिलच्या लढाईची गोष्ट मुलांना सांगितली.

## विज्ञान-तंत्रज्ञान फिरती प्रयोगशाळा





◆ **गुणगौरव समारंभ –** विभागाने घेतलेल्या 'संचय ऊर्जेचा अविष्कार विज्ञानाचा' या स्पर्धेचा गुणगौरव समारंभ दि. २४ जूनला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विज्ञान शिक्षण आणि संप्रेषण केंद्रात आयोजित करण्यात आला. ओम्कार पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर जिवाणूच्या मॉडेलचे अनावरण कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.मोहन वाणी, (संचालक-राष्ट्रीय पेशी विज्ञान केंद्र, पुणे विद्यापीठ), श्री. सुहास काणे व श्री. विश्वास कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. प्रा. राजेंद्र देवपूरकर यांनी या केंद्राची माहिती सांगितली.

सर्व सहभागी ३५ शाळातील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. वाणींच्या हस्ते बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच सहभागी शाळांना स्मृतीचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन करताना प्रा. वाणी म्हणाले, 'स्पर्धा हे निमित्त असते. तुमच्या ज्ञानात वाढ होणे हा खरा त्यामागील हेतू असतो. विद्यार्थ्यांनी साहस, जिद्द व चिकाटीच्या जोरावर अपयशाने निराश न होता, खचून न जाता यश प्राप्त होईपर्यंत सातत्याने प्रयत्न करत राहिले पाहिजे.'

या कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थी व शिक्षकांनी विज्ञान, शिक्षण आणि संप्रेषण केंद्रातील विविध विज्ञान दालनातील प्रयोग पाहिले. केंद्रातील सात मार्गदर्शक या प्रयोगाची सर्वांना माहिती देत होते. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक आणि व वर्धिनीचे कार्यकर्ते असे १२५ जण सहभागी झाले.

### ◆ कार्यशाळा व अभ्यास दौरा –

विभाग प्रमुख श्री. विश्वास कुलकर्णी आणि विभागाचे पालक श्री. सुनील कुलकर्णी, श्री. सुहास काणे सर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि गटाच्या समन्वयक मनीषाताई पाठक यांच्या नेतृत्वाखाली दि. १५ जुलै ते २० जुलै नर्मदालय संस्थेचा अभ्यास दौरा झाला. श्री. रविराज पाटील, श्री. योगेश तांबट, सौ. दीप्ती डोळे, कु. सई देशपांडे, सौ. रेवतीताई गोरे, श्री. ओम गोरे, श्री. शशांक बनकर, कु. साकार दिवेकर दौऱ्यात सहभागी होते. रविवार सकाळी ११ वाजता लेपा येथे पोहचलो. नर्मदालयाच्या संस्थापिका मा. भारतीताई ठाकूर यांच्यासोबत बैठक झाली. यामध्ये सर्वांचा परिचय झाला व पुढील नियोजन करण्यात आले.

दि. १७, १८ जुलैला रामकृष्ण सारदा निकेतन हायस्कूल, लेपा पुनर्वास, ता. कासारवत, जि. खरगोन व रामकृष्ण सारदा निकेतन हायस्कूल, छोटी खरगोन, ता. कासारवत, जि. खरगोन या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी विज्ञान आणि गणित कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रमाची सुरवात दीप्तीताई यांनी हिंदीतून विज्ञान गीत घेऊन केली. विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मिथुन राठोड आणि मुख्याध्यापिका सौ. बिंदू कुशवाह यांनी सर्वांचे स्वागत केले.

विज्ञानातील संकल्पना स्पष्टीकरणावर विविध प्रयोगातून भर होता. यासाठी पाचवी ते सातवी विद्यार्थ्यांचे तीन गट आणि ८ वीच्या पुढील विद्यार्थ्यांचा एक गट असे गट पाडले होते. पहिला गट – ओम गोरे – गतीवर आधारित प्रयोग, दुसरा गट – शशांक बनकर – भिंगे आरसे आणि दुर्बिणीवर आधारित प्रयोग, तर तिसरा गट – सई देशपांडे – चुंबकाचे प्रकार व त्यावर आधारित प्रयोग मुलांना दाखवले. श्री. सुहास काणे सरांचे 'अंटार्क्टिका'चे अनुभव कथन तर सर्व उपक्रमात मेरूमणी होता. तेथील शिक्षकांनीही विज्ञान प्रयोगात भाग घेऊन सहकार्य केले. रोज संध्याकाळी शाखेतील मैदानी खेळ घेण्यात आले.

रोबोटिक्स, इलेक्ट्रॉन संरचना मॉडेल, विज्ञानातील एकेका संकल्पनेवर आधारित प्रयोग, दीप्तीताईंचे गणिताचे कृतीयुक्त उपक्रम, विशेषत: कागदी टोप्या तयार करून त्यातून भूमितीय संकल्पना समजावून घेणे, मैदानी खेळ, गाणी अशा अनेक उपक्रमात मुले उत्साहाने सहभागी झाली.

भट्टयाण येथील शांतता, सोबतीला नर्मदामैय्या हे वातावरण अंतर्मुख करणारे होते. ओम, शशांक, साकार आणि सई यांचा सहभाग उत्तम होता. सर्व संकल्पना समजावून घेऊन मुलांना स्पष्टीकरण देत होते. नाविन्यपूर्ण खेळातून गणितातील संकल्पना स्पष्ट होत होत्या. मुलामुलींच्या चेहऱ्यावरील आनंद आम्हाला काम करताना समाधान देत होता.

अशाच प्रकारचे उपक्रम श्री गणेश विद्या मंदिर ऊ. मा. विद्यालय, १३२, पळसीकर कॉलनी, इंदोर येथेही घेण्यात आले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नीता दुर्वे यांनी सर्वांचे स्वागत केले आणि समारोपात संस्थेच्या अध्यक्षा सौ. स्नेहल महाजन व सचिव श्री. नकुल उपासनिक यांनी आभार मानले.












**'संचय ऊर्जेचा अविष्कार विज्ञानाचा' स्पर्धेचे बक्षीस प्राप्त विद्यार्थी**

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | मृणाली दत्तात्रय नाईकडे | नवीन माध्यमिक विद्यालय, मरकळ, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| २. | कादंबरी शिवाजी जाधव | श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, किकवी, तालुका भोर, जि पुणे |
| ३. | वेदिका विनायक साकुरे | रामचंद्र गायकवाड माध्यमिक विद्यालय, दिघी, तालुका हवेली, जिल्हा पुणे |
| ४. | रिद्धी गजानन काकडे | श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, किकवी, तालुका भोर, जि पुणे |
| ५. | साक्षी विष्णूभगवान जगदाळे | श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, किकवी, तालुका भोर, जि पुणे |
| ६. | प्रज्ञा वैजीनाथ सानप | महात्मा गांधी विद्यालय, राजगुरुनगर, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| ७. | संस्कृती शेटे | न्यू इंग्लिश स्कुल, उत्रोली, तालुका भोर, जि पुणे |
| ८. | आदिती अंकुश शेजाळ | रामचंद्र गायकवाड माध्यमिक विद्यालय, दिघी, तालुका हवेली, जिल्हा पुणे |
| ९. | प्रेम आमिष टेकाळे | नवोन्मेष विद्यामंदिर, चाकण, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| १०. | प्रियांका मारुती गायकवाड | ज्ञानदा प्रशाला, किरकटवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे |
| ११. | सुर्वेश विठ्ठल जामदार | बालक मंदिर संस्था इंग्लिश स्कूल, कल्याण, |
| १२. | तनिष्का निलेश खुस्पे | रामचंद्र गायकवाड माध्यमिक विद्यालय, दिघी, तालुका हवेली, जिल्हा पुणे |
| १३. | श्रावणी रत्नाकर झुंजारराव | कर्नल रवींद्र माधव ओक हायस्कूल, कल्याण |
| १४. | मयुरी संतोष शिंदे | भैरवनाथ विद्यालय, दोंदे, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| १५. | प्रतीक्षा संतोष होजगे | सरस्वती विद्यालय, औदर, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| १६. | श्रेया उमेश पाटोळे | भैरवनाथ विद्यालय, दोंदे, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| १७. | सुजाता सहादू देवकर | ज्ञानदा प्रशाला किरकटवाडी, तालुका हवेली, जिल्हा पुणे |
| १८. | अनुष्का नारायण करपे | नवोन्मेष विद्यामंदिर, चाकण, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| १९. | सई सुधीर पिंगळे | श्री. म्हाळसाकांत विद्यालय, आकुर्डी, पुणे |
| २०. | राज शशिकांत तापकीर | नवोन्मेष विद्यामंदिर, चाकण, तालुका खेड, जिल्हा पुणे |
| २१. | तेजल अशोक देशमुख | सरस्वती विद्यालय, औदर, तालुका खेड, जिल्हा पुणे |

## उत्थान विभाग

◆ वार्षिक नियुक्ती – वस्तींमध्ये चालणाऱ्या अभ्यासिकांमधील अभ्यासिका प्रमुखांच्या नियुक्त्या दि. २ जुलैला संस्थेचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी, विभाग पालक श्री. संदीप मोरे, श्रीमती पुष्पा नडे, सौ. अनुजा पाटील यांच्या उपस्थितीत जाहीर झाल्या. विश्वास सरांनी 'संघटन आणि सामाजिक काम' याविषयी तसेच नवीन जबाबदारी स्वीकारून अभ्यासिका कशा फुलवल्या पाहिजेत, हे काम करताना आपली शैक्षणिक प्रगती कशी साधावी, सहकार्याची भावना कशी जोपासावी याबद्दल मार्गदर्शन केले.

◆ एकत्रीकरण – महात्मा फुले भागातील आठवी ते दहावीतील २३ विद्यार्थ्यांचे एकत्रीकरण केशवराव जेधे शाळेत झाले. 'संघटन' या विषयाला अनुसरून पद्य, गट चर्चा व खेळ घेण्यात आले.

◆ वर्धापन दिन – महात्मा फुले भागातील शिवराय अभ्यासिकेच्या वर्धापनदिनी मुलांनी वर्ग उत्साहाने सजवला. विभाग पालक श्री संदीप मोरे व सौ सुवर्णाताई यांनी मुलांशी संवाद साधला.

◆ गुरुपौर्णिमा – प्रियदर्शनी अभ्यासिकेतील मुलांनी 'गुरु महिमा' या विषयावर कथाकथन केले. गुरुकुल अभ्यासिकेत प्रमुखांचे व शिक्षकांचे फुले देऊन मुलांनी आशीर्वाद घेतले.

◆ समुपदेशन केंद्र – जुलै महिन्याच्या बैठकीत या वर्षाची उद्दिष्टे ठरवण्यात आली. मुलांची अभ्यास कौशल्ये वाढावीत यासाठी वेगवेगळ्या उपक्रमांची आखणी करणे, दहावीनंतरच्या मुलांना करिअर मार्गदर्शन करणे, किशोरी विकास प्रकल्पातून किशोरींना संयम सत्रातून मार्गदर्शन करणे, पालकांसाठी उपक्रम घेणे या गोष्टींवर भर देण्यात येणार आहे.

◆ किशोरी विकास प्रकल्प – दि. १६ जुलैला वर्धिनीच्या ओमकार सभागृहात परिसरातील वस्तीमधील किशोरींचे एकत्रीकरण झाले. ओंकार पूजनाने सुरुवात झाली. विभागप्रमुख श्री. उमेश माळेकर यांनी यामागची संकल्पना स्पष्ट केली. खेळ, अभिनय गीत, पद्य झाल्यानंतर श्रीमती अंजलीताई लेले यांनी किशोरवयातील बदलांबद्दल मुलींशी संवाद साधला.

स्वामी दयानंद शाखेचा युवक निमेश यादव याने मुलींना तलवारबाजीचे प्राथमिक शिक्षण दिले. यातून ढाल तलवार या साहित्याची माहिती तसेच या खेळातून होणारा व्यायाम मुलींना समजला. वेगळ्या खेळाचे प्रशिक्षण मुलींनी उत्साहाने घेतले व अजून पुढे शिकायची तयारी दर्शवली.





# शाखा विभाग

## शाखा विभाग समिती- २०२३-२४. नवीन समिती सदस्यांचे अभिनंदन !!

- **शाखाविभाग सहकार्यवाह व पालक -** विनोद बिबवे, शाखाविभाग प्रमुख - शुभम जगताप,
- **शाखाविभाग सहप्रमुख -** सतीश बिराजदार
- भागप्रमुख - पेठ भाग १ - मोहन कानडे, बिबवेवाडी भाग २ - प्रतिक कडू, कर्वेनगर भाग ३ - अक्षय मुळे, गोखलेनगर भाग ४ - हनुमान मेकडे, सिंहगड भाग ६ - केतन खेडकर, पद्मावती भाग ७ - अजय रायकर
- **केंद्रीय व्यवस्था प्रमुख व सहप्रमुख -** मैदान - ओम इजंतकर, पुष्कर सागडे, तासिका - रोनक खाटेर, केतन क्यादर, संपर्क - वैभव धोत्रे, कार्यक्रम - शुभम नरके
- **केंद्रीय समिती मार्गदर्शक मंडळ -** विनेश नगरे (शाखा मैदान, क्रीडा), मनीषा पाठक (तासिका), सुमित डोळे (कार्यक्रम), संदीप मोरे (संपर्क), कोमल धायरकर (वर्धन कृती पुस्तिका)

## युवा विभाग समिती २०२३-२४

- **युवा विभाग सहकार्यवाह व पालक** - अमोल उंदरे,
- युवा विभाग प्रमुख - चेतन कुसाळकर
- **भाग युवाप्रमुख व सहप्रमुख -** पेठ भाग १ - अक्षय भेगडे, बिबवेवाडी भाग २ - चेतन ठाकरे, किशोर बेंडगे, कर्वेनगर भाग ३ - प्रशांत साळुंके गोखलेनगर भाग ४ - अक्षय कदम, सिंहगड भाग ६ - प्रथमेश मातेरे, पद्मावती भाग ७ - चेतन ठाकरे, किशोर बेंडगे
- **केंद्रीय व्यवस्था प्रमुख व सहप्रमुख -** निर्माण शाखा - प्रणव पोळ, नेतृत्व शाखा - राज जाधव, आकाश देशमुख, प्रेरणा शाखा - सचिन सनगरे, अमोल शेलार.
- **केंद्रीय समिती सदस्य -** शिवाजी खरात, मंदार रायरीकर (प्रेरणा शाखा), राहुल पायगुडे (निर्माण शाखा), सुरेश पवार (नेतृत्व शाखा)

## वर्धिका आणि युवती विभाग २०२३ - २०२४

- **भगिनी निवेदिता शाखा -** शाखा प्रमुख - गायत्री मोरें, युवती प्रमुख - समृद्धी यादव, शाखा पालक - तेजश्री होले
- **क्रांतीज्योती सावित्री शाखा -** शाखा प्रमुख - वैष्णवी परदेशीं, युवती प्रमुख - निकिता खताळ,
- **शाखा पालक -** कविता गौड-अयाचीत,
- **प्रयत्न शाखा -** शाखा प्रमुख - साक्षी शिंदे, युवती प्रमुख - रेश्मा पोटे, शाखा पालक - हर्षाली वाघोले
- **युवती विभाग -** भाग प्रमुख - दिव्या घारे, विभाग पालक - बागेश्री पोंक्षे, विभाग प्रमुख - डॉ. मनीषा नारकर, व्यावसायिक युवती प्रमुख - दिपाली थोरात
- **भाग युवती प्रमुख -** किरण राठी-भट्टड, संपर्क व्यवस्था - सुरेखा माळी, कार्यक्रम व्यवस्था - वैदेही बेहेरे-जाधव, तासिका व्यवस्था - लता पुरंदरे-टिळेकर, विस्तारक - पुजा बत्तीन-मामेडी, पायल जिरेसाळ, मानसिक विकास - छाया गायकवाड - सकटे, रोहिणी तेंडूलकर -दिघे

❖ ❖ ❖



◆ **समर्थ रामकृष्ण शाखा** – दि. २२ जुलै रोजी लो. टिळक जयंती निमित्त कु. समृद्धी यादव ताईचे व्याख्यान झाले. ज्ञानेश पुरंदरे यांचा स्मृतिदिन असल्यामुळे त्यांचे स्मरण करून ताईने विषयाला सुरुवात केली. वर्धकांना पारतंत्र्यातील भारत, छोटा बाळ ते लोकांचे लोकमान्यपर्यंतचा प्रवास व टिळकांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न याची सविस्तर माहिती ताईंनी दिली.

◆ मल्लखांब आणि पथक प्रारंभ – दि. २६ जुलै पासून पथकाचा सराव सुरू झाला. मल्लखांब आणि पथक साहित्याचे पूजन हर्षल नरवडे दादा व पालक यांच्या हस्ते झाले. सध्या दररोज मल्लखांब खेळासाठी लागणारा वैशिष्ट्यपूर्ण व्यायाम करून मल्लखांब सराव व झांज पथकातील प्रकार शिकवून पुढील सराव चालू आहे.

◆ **स्वामी ब्रह्मानंद शाखा** – एक वेगळा प्रयोग शाखेवर घेण्यात आला. आठवीच्या वर्धकांनी शाखेची धुरा सांभाळली. शाखा भरवण्यापासून, व्यायाम, खेळ, समता, प्रार्थना, परिपाठ, प्रश्नमंजुषा, मारुती स्तोत्र या सर्व गोष्टी आठवीच्या वर्धकांनी घेतल्या. सगळे युवक वर्धक होऊन शाखेत वावरत होते. शाखा घेताना मुलांमध्ये खूप उत्साह आणि स्फूर्ती दिसून आली. एकमेकांना समजून घेत त्यांनी शाखा घेतली. नियोजन उत्तमरित्या पार पाडले.

◆ **राजर्षी शाहू शाखा** – कार्यक्रम विभाग – दर रविवारी मानसिक विकास बैठक झाली. त्यात सकाळी ६.३० वाजता उपासना झाल्यानंतर उपासना केल्याने 'एकाग्रता' वाढते, उपासना म्हणजे 'आत्मपरीक्षण' करणे असे उपासनेचे महत्त्व मुलांना सांगितले. वर्धिनीचे प्रार्थनेतील चार चरणांपैकी प्रत्येक रविवारी एका चरणाचा अर्थ मुलांना समजावून सांगितला. मुलांचे तीन गट करून प्रत्येक गटाने प्रार्थनेतील चरणाचा त्यांना समजलेला अर्थ लिहिणे, गटाने लिहिलेल्या अर्थाचे सादरीकरण करणे असा उपक्रम झाला. 'भारत इतिहास संशोधन मंडळ' येथील क्षेत्रभेटीत ऐतिहासिक गोष्टी दाखवण्यात आल्या. शाखेत 'आदर्श पद्यवही' ही स्पर्धा सुरू आहे, त्यात आठवड्यातून एक पद्य लिहायचे व ते पाठ करायचे अशा प्रकारे स्पर्धा पुढेही चालू राहणार आहे.

◆ मैदान विभाग – शाखेत नियमित नियोजनानुसार खेळ, व्यायाम, दर बुधवारी शारीरिक क्षमता वाढवण्यासाठी, शिस्तीसाठी सिपेट सिपॅड किट सराव, समता घेण्यात आली. दर आठवड्याला उत्कृष्ट खेळाडू निवडून त्याला बक्षीस देण्यात आले. लांब उडी, गोळा फेक, भाला फेक व इतर खेळ घेण्यात आले.

◆ संपर्क विभाग – दि. १९ जुलै रोजी पालक सभा घेण्यात आली. प्रमुख पाहुणे, मुख्याध्यापिका श्रीमती अनुसया सायगावकर यांनी शाखेच्या उपक्रमांचे महत्त्व पालकांना सांगितले. शिवगर्जना मित्र मंडळात शिव वंदना घेण्यात आली. परिसरातील नागरिकही यात सहभागी झाले होते.

◆ **स्वामी योगानंद शाखा** – मैदान विभाग – शाखेत दररोज नियमित खेळांबरोबर दंडगोल व फुटबॉल या दोन मोठ्या स्पर्धा झाल्या.

◆ कार्यक्रम विभाग – शनिवारी शक्ती बुद्धी स्पर्धा एका नवीन रुपात घेण्यात आली. स्पर्धेत बदल करून त्यात ॲडव्हांटेज राऊंड घेण्यात आले.

तासिका विभाग – स्वयं अध्ययनाबरोबर वर्धकांचे विज्ञानातील संकल्पना स्पष्ट करणारे प्रयोग घेण्यात आले.

◆ **स्वामी विवेकानंद शाखा** – वर्धापन दिन – दि. ०२ जुलै रोजी संत रामदास स्वामी विद्यालय, पांडवनगर येथे संध्याकाळी ७:०० ते ९ या वेळात 'छत्रपती शिवराय' (शिवरायांच्या ३५० राज्यभिषेक वर्षाच्या पार्श्वभूमीवर आधारित) या संकल्पनेवर आधारित शाखेचा वर्धापन दिन साजरा झाला.



◆ आयाम १ – सांस्कृतिक कार्यक्रम – शिवरायांच्या जन्माआधीची परिस्थिती, महाराजांचा जन्म, महाराजांची जडणघडण, रायरेश्वर मंदिर शपथ, अफजलखान वध, तुकाराममहाराज-शिवराय भेट, शिवरायांपासून क्रांतिकारकांची प्रेरणा, शिवराज्याभिषेक – या विषयांवर नृत्य, अभिनय यांच्या सहयोगाने ४० मिनिटांचे सादरीकरण झाले. पालक, युवक व मुले या सर्वांचा यात सहभाग होता. प्रमुख वक्ते मा. प्रशांतजी डोंगरे यांनी महाराजांच्या प्रसिद्ध लढायांतून मिळालेली शिकवणूक व दैनंदिन शाखा स्वतःच्या प्रगतीसाठी कशी महत्त्वाची आहे हे सांगितले. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. अशोकजी देशमाने यांनी मार्गदर्शन केले. महाराजांच्या आरतीने कार्यक्रमाची सांगता झाली.



◆ आयाम २ – पालक एकत्रीकरण – पालकांसाठी रांगोळी व वेशभूषा स्पर्धेचे आयोजन झाले. शिवरायांची पालखी सोहळा कार्यक्रम घेण्यात आला. 'शिवराय व संतपरंपरा' या विषयावर व्याख्यान घेण्यात झाले. या उपक्रमातून पालकांचे संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.





◆ आयाम ३ – युवक एकत्रीकरण – गेल्या ४१ वर्षातील युवकांची माहिती जमा करण्यात आली. त्याची एक्सेल शीटस् तयार करण्यात आली. संपर्क मोहिमेत काही वरिष्ठ युवक देखील सहभागी होते. त्यामुळे सर्व युवकांना कार्यक्रमाचा निरोप मिळाला व ते कार्यक्रमास उपस्थित राहिले.

◆ आयाम ४ – बालशाखेची पायाभरणी – बालशाखा घेणारा गट ठरवण्यात आला.त्या युवक गटाचे वेगवेगळ्या प्रकारचे प्रशिक्षण सुरू झाले. किमान १० संख्येने बालशाखा सुरू झाली.

या सर्व उपक्रमांमध्ये प्रत्येक युवकांचे, वरिष्ठ युवकांचे व पालकांचे सहकार्य होते. व्यवस्थापन कौशल्य, संवाद कौशल्य, पुढाकार घेण्याची इच्छाशक्ती निर्माण करणे, नेतृत्व गुण, निर्णय क्षमता या गोष्टी कार्यक्रमाअंतर्गत युवकांना शिकण्यास मिळाल्या. उपस्थिती – वर्धक : ४५, युवक : २५, पालक : १५०





◆ **धर्मवीर शंभुराजे शाखा** – धुवाधार पावसाने विश्रांती घेतल्यानंतर सर्व वर्धक पुन्हा मैदानात खेळले. दंड रिंग खेळताना वरून रिमझिम पाऊस तर खाली चिखल असे वातावरण होते. हा खेळ मैदानावर व्यायाम करण्यासाठी आलेले लोक बघत होते. त्यांच्या उस्फूर्त प्रोत्साहनातून असं जाणवत होतं की त्यांना त्यांचं बालपण नक्कीच आठवलं असेल. त्यानंतर झालेली समता पाहून ते आश्चर्यचकीत झाले. संख्या : वर्धक : ३८, युवक : ०७

◆ वृक्षारोपण संकल्प – दि.०९ जुलै रोजी शाखेतले वर्धक व युवक तळजाई टेकडीवर वृक्ष लागवड करण्यासाठी गेले. शाखेने ५० वृक्ष लावण्याचा संकल्प केला होता व तो ५१ वृक्ष लावून पूर्ण करण्यात आला. मुलांना यावेळी वृक्ष लावणे काळाची गरज आहे हे



लक्षात आले. वृक्ष नसतील तर आपले काय होईल? वृक्ष आपल्याला काय देतात? आपण लावलेला एक वृक्ष पर्यावरणात काय बदल घडवू शकतो? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मुलांना नंतर झालेल्या चर्चेतून नक्कीच मिळाली. यावेळी वर्धकांना प्रोत्साहन देण्यासाठी श्री अजय दादा कदम, श्री विनोद बिबवे सर, शाखेचे युवक प्रमुख श्री. संदीप जोगळे सर व त्यांचे सहकारी सहभागी झाले. त्यानंतर सर्व वर्धकांनी स्वच्छता मोहीम राबवून परिसर स्वच्छ केला. उपस्थित संख्या : वर्धक : ३६ युवक : ०७



◆ पर्यावरण मास विशेष – शाखेत मुलांना 'पर्यावरण का जपावे लागेल' याचा विचार करायला लावणारे काही प्रेरणादायी व्हिडिओ दाखवण्यात आले. यातून मुलांना पर्यावरण किती महत्त्वाचे आहे, प्लॅस्टिक कचरा आपल्यासाठी किती हानिकारक आहे हेही मुलांच्या लक्षात आले. यानंतर मुलांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली यामध्ये निसर्ग चित्र, वृक्ष लावताना मी, माझ्या शाळेचे मैदान, वृक्षाशिवाय शहर असे विषय त्यांना देण्यात आले. उपस्थिती : ५८.

◆ ३५० वा राज्यभिषेक सोहळा – छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० व्या राज्याभिषेक सोहळ्याचे औचित्य साधून जुलै महिन्याच्या दर सोमवारच्या परिपाठामध्ये महाराजांच्या विविध पैलूंचे दर्शन घडवून देण्याचा प्रयत्न केला. शाखेचा व्यवस्थापक आदित्य सुळे दादाने शिवाजी महाराजांचे नियोजन कसे होते आणि आपले कसे असावे हे महाराजांनी शाहिस्तेखानावर केलेल्या हल्ल्याच्या प्रसंगातून वर्धक व युवकांना सांगितले. सत्र झाल्यानंतर शिवाजी महाराजांचे प्रेरणा मंत्र आणि ध्येय मंत्र घेतले. उपस्थित संख्या – ५१



◆ **स्वामी शिवानंद शाखा** – दि. १८ जुलै रोजी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व लोकशाहीर अण्णाभाऊ यांचे विचार, त्यांनी केलेला संघर्ष, दिलेली हक्कासाठीची लढाई, लोककलेतून केलेले जनमनाचे पुर्ननिर्माण, प्रभावी लेखणीतून व अनमोल वाणीतून वंचिताच्या व्यथा मांडणारे लोकशाहीर, लेखक, समाजसुधारक स्वातंत्र्य चळवळ आणि

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व याला अनुसरून अण्णा भाऊ साठे यांचे जीवनचरित्र सांगण्यात आले. उपस्थिती – २७.







## अभिनंदन







- संस्थेचे उपाध्यक्ष **श्री. शिरीष पटवर्धन** यांना गीताधर्म मंडळ, पुणे यांच्यामार्फत यावर्षीचा पत्रमहर्षी ग. वि. केतकर पुरस्कार मिळाला.
- संस्थेचे कार्याध्यक्ष **डॉ. संजय विष्णू तांबट** हे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील 'संज्ञापन आणि वृत्तपत्र विद्या' विभागाचे प्रमुख झाले आहेत.
- वर्धिनीची युवती कार्यकर्ती **ॲड. सौ. भाग्यश्री सुनीलजी बोरा** हिची शिरुर बार असोसिएशनच्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.

**सर्वांचे वर्धिनी परिवाराकडून मन:पूर्वक अभिनंदन.**

## श्रद्धांजली

- वर्धिनीचे मार्गदर्शक **श्री. त्र्यंबकराव आपटे** सर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. सुरुवातीच्या काळात गणपती विसर्जन मिरवणुकीत वादन पथकाला मार्गदर्शक म्हणून व इंग्रजी, गणित या विषयांच्या अध्यापनात अनेक वर्षे विद्यार्थ्यांना त्यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले.
- राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ प्रचारक आणि माजी सह-सरकार्यवाह, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे संघटनमंत्री म्हणून दीर्घकाळ काम केलेले **श्री. मदनदास देवी** यांचे निधन झाले.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.**